# चित्रा



REFBK-0009392

REFBK-0009392

९५६

म. ग्रं. सं. ठाणें

विषय काव्य

सं. क्र. 93८५९

PHADNIS

संजीवनी मराठे

३०७ १९५८

ग. पां.
परचुरे प्रकाशन मन्दिर

2

# चित्रा

संजीवनी मराठे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 22048 वि:
क्रमांक 7389 नों: दि:

REFBK-0009392
REFBK-0009392

दा: क्र. 8383

प्रकाशन क्र. १५३

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४

मूल्य तीन रुपये

आवृत्ति पहिली
मे १९५७

सर्वाधिकार सौ. संजीवनी मराठे, कचेरीवाडी, पुणें ४, यांचे स्वाधीन

मुखपृष्ठ सजावट : श्री. फडणीस

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, गिरगांव, मुंबई ४
प्रकाशक : ग. पां. परचुरे, परचुरे प्रकाशन मन्दिर, गोरेगांवकर चाळ क्र. २, गिरगांव, मुंबई ४

# अनुक्रम


गीत नव्यानें १
कळा २
भिंतीवरतीं ३
मध्येंच कधिं जर ४
उत्तर ५
आठव ६
हें इथें उमलतें ७
तुझी लाभतां प्रीती ८
माहेर ९
मंगल गान १०
ती आशेची कळी ११
माझें तुझें १२
तुझी स्नेहल स्मृती १३
आग १५
सुट्टी १६
वास्तवाच्या वाळवंटीं १७
घर १८
ओढ सांवळी २०
पण २१
तूं नि मी २२
ऋण २३
नको ताटातुटी २४
मौन २५
तुज स्मरतं ना २६
मणी २७
जीवनलहरी २९
प्रीतीखातर ३१
जीवन ३२
खूण ३३
खोड ३४
स्नेहतत्त्व हें ३५
पारिजात ३६
नाद ३७
खोल तळांत ३८
उपेक्षाच नेसण्या ३९
उगीच ४०
कधीं कधीं ४१
आभाळ ४२
कात्री ४३
शंकिता ४४
तीच काय मी ४५
अमृतकथा ४६
नाहीं आतां ४७
स्वप्न ४८
स्मरण्याजोगें ४९
झुलतां झुलतां ५०
एका सुरांत मजेनें ५१
क्षितिजावरतीं ५२
छंद ५३
इथें ५४
ओझें ५५
गांठ ५७

उगाचच ५८
माझ्या आशा ५९
असें न व्हावें ६०
थाट आगळ ६१
म्हणूं कशाला ६२
असलें वादळ—असली शांति ६३
स्त्री माझें नांव ६४
प्रश्न कशाला ६५
लग्नसराई ६६
तुझें ऐकुनी कवन ६८
ऐन रात्रिला ६९
या इवल्या हातांनीं ७०
हे परमात्मन् ७१
आज मी ७२
बहाणा ७३
होती आशा ७४
रेघ पुसटली ७५
भासच ७६
या वळणावर ७७
राधेश्याम ७९
दैन्य ८०
व्यथा ८१
बंध ८२
दिसे ना दिसे ८३
भक्त ८४

# गीत नव्यानें

गीत नव्यानें गावें म्हणशिल,
कल्पनेस दे नविन उजाळा;
वृत्तींना दे नवा फुलोरा,
भावनांस अन् नवा उमाळा !

दाव दृष्टिला नवीन क्षितिजें
जेथ विजेची चमक नवोनव;
श्रवणावरतीं आण [illegible]
नव्या युगाचा नवीन [illegible] !

बाहूंना बल, जोम पदांना;
ओढ सिद्धिची संकल्पांना;
गीत नव्यानें गावें म्हणशिल,
प्राण नवा तर दे शब्दांना !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ६३८२
ग्रंथ शाखा

संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
220458 दि: 3.10.57
क्रमांक 9364 नों: दि: 9.7.1.58

## कळा

त्या स्थलींच, त्याच क्षणीं,
त्या वचनीं, त्या नयनीं,
तें दर्शन घडलें मज
त्या रूपीं अवतरुनी !

गिरिकंदर, वृक्षराजि,
सागरतल, वाळूरण,
काळरात्र, धूलिपटल,
कर्णकटू घनगर्जन—

या सर्वांआडुनियां
खुणवित तें रूप मला;
पाहुं तरी कशी ? किती ?
कुठवर या साहुं कळा ?

# भिंतीवरतीं

भिंतीवरतीं लटकत राहे
एक गोमटी चंदनपुतळी;
लावण्याची तिच्या नव्हाळी
अंगप्रत्यंगीं मुसमुसली.

स्कंधावरतीं एकतार अन्
कमलपुष्प घे उजव्या हातीं;
तृणपात्यांतुन लकेरीपरी
हुंगत, गुंगत फिरत जाय ती.

गालीं स्मितहास्याच्या रेषा,
मुरड बोलते अधरावरली,
"मी कवि-प्रतिभा अद्भुत, अस्थिर;
मी नच केवळ चंदनपुतळी!"

एकांतीं निःशब्द निरामय
चाले अमुचें सहसंवेदन;
मी संसारीं, ती फलकावरि
बंदिस्त तशा निसंग, उन्मन!

गात गतीचें गीत अगतिका—
ती मधुरा—नांदे मजजवळीं;
जननान्तरिंच्या ऋणानुबंधित
मी आणिक ती चंदनपुतळी!

# मध्येंच कधिं जर

जातां जातां मध्येंच कधिं जर
वाटेवर मी थकुनी बसलें,
नभांतल्या नवकिरणांनीं मज,
स्मरतें, गतिचें गीत गायिलें !

हसतां हसतां मध्येंच कधिं जर
अश्रू ओघळले नयनांतुन,
झुळुक निळ्यांतुन, लहर जळांतुन,
उठली—गेली मजला हसवुन.

देतां देतां मध्येंच कधिं जर
कर माझा माघारीं वळला,
बीजाचा हुंकार भुईंतुन
प्रेमें मज जागवून गेला.

जगतां जगतां मध्येंच कधिं जर
चैतन्या मन मुकून बसलें,
प्रत्ययांतुनी अशाच तें मम
मनांत पुनरपि झरलें—भरलें !

# उत्तर !

दहा जणांच्या या खड्या पहाऱ्यांत,
गृहकृत्यांच्या या राड रगाड्यांत,
विसरून जातें मी माझी मलाच.
व्यवहाराच्या बुरख्यामध्यें
जातो लपेटून माझा मनोदेह,
शरीरहि जातें भुकेखेरीज सारें विसरून.
राबणें, खाणें, विसावणें,
याहून नाहीं निराळें जिणें.
पण रात्रीस—
थांबतो कल्लोळ; लागतो सूर.
बधिरता जाते, येते हुर्हूर.
आणि उकलतो
जीवनविश्वाचा बंदिस्त गाभा !
तुझ्यांतील बेफिकिरीदेखील
निघते न्हाऊन संध्यासरोवरांत स्नेहार्द्र—उन्मन !
शेजघरा येते गोकुळाची कळा;
लागतो घुमाया प्रणयवेणूचा आकुल सूर !
श्वासांच्या तालांत धरूनियां फेर
नाचतों आपण नव्या रासलीला.
थांबून मध्येंच
बेहोष नेत्रांत बिंब पाहतांना
पुसतें मी तुला—"खरेंच कोणाचा,
माझाच ना तूं, अगदीं माझाच ?"
लोपतें अंतर,
—मिळतें उत्तर !

# आठव

माझ्या मनचा रावा उद्यां दिगंत उडावा,
शशिसूर्यांच्या संगमावरी तेजोरासिं निथळावा;
शीतकालिं पण सुखोष्ण त्याला
माझा आठव व्हावा!

आज तया झुलवावें,
खिलवावें, खुलवावें,
डोलविण्यास्तव भावविभूषित
स्वरहिंडोल रचावे!

आज तया हसवावें;
प्रसन्नतेच्या तळ्यांत हलकें
गंधभरें उमलावें!
मदगंधित तें मोहन अवघें
कणीं कणीं पसरावें.
उराउरांतुन एकच स्पंदन व्हावें,
माधुर्यानें एकच गुंजन गावें,
सर्वस्वानें एक निमंत्रण द्यावें,
अन् उमटावा दो कंठांतुन एक सजल स्वर!

अदय 'उद्यां' उगवावा,
रावा स्वैर उडावा;
तो सजल स्वर मात्र जिव्हाळीं
प्राणांपरि बिलगावा!

# हें इथें उमलतें

हें इथें उमलत फूल, त्या फुलावयाचा छंद;
या पसाऱ्यांत नित्याच्या किति दुर्मिळ दुर्मिळ गंध.

हे भुरभुरणारे केश हा, तंग मुलायम वेश,
हे हसरे हसरे डोळे, चालींत मूर्त आवेश.

हे लबाड हवले अधर, त्यांतिल ही मधुमधु भाषा
आशयांत मुग्ध सखोल जाणत्या मनाची आशा.

मी क्षणाक्षणाला टिपितें हे आंसू अन् हें हांसूं
प्राणांत झेलुनी घेतें या जीवाला जिज्ञासू.

माझेंपण मजला कुठलें, या फुलांत मी लपलेली ?
लोपण्यांत सार सुखाचें, ज्याखातर मी टपलेली.

## तुझी लाभतां प्रीती

तुझी लाभतां प्रीती मजला
भीती नुरली या हृदयीं,
मधुर मंगले रूपमयी !

अतां धरेवर घोर निशा येउं दे;
काजळ काळें दहा दिशा व्यापुं दे;
तेजोगीतें गातच राहिल
प्रीतिदीप तव या हृदयीं,
मधुर मंगले, रूपमयी !

अपंगास मज पंख काय लाभले ?
अंधमुखीं कीं नेत्रयुग्म उमललें ?
या अतिचंचल अनिकेताला,
दिलास थारा निज हृदयीं
मधुर मंगले, रूपमयी !

सद्भावांची इथें दिवाळी अतां;
सुखासुखाची इथेंच एकात्मता;
सौंदर्यांचा अभिनव संगम
अतां तुझ्या-माझ्या हृदयीं,
मधुर मंगले, रूपमयी !

# माहेर

माझ्या माहेराची वाट
पानाफुलांची, फळांची,
मखमाली हिर्वळीची !

माझ्या माहेरचें घर—
घर परमानंदाचें,
जसें गोकुळ नंदाचें !

माझ्या माहेराची रीत—
रीत ऋजु वळणाची,
स्नेह आणि सौजन्याची !

माझ्या माहेराची कीर्त
लोकीं दुर्मिळ दुर्मिळ :
कस्तुरी परिमळ !

माझ्या माहेराचा मान
वडिलांनीं वाढविला;
आम्हां हातीं सोपविला !

माहेराची फुलवात,
सासराचें नीरांजन :
प्रकाशाला आमंत्रण !

# मंगल गान

या गडे हांसूं या; या गडे नाचूं या
गाऊं या मंगल गान. ध्रु.

खेळूं या फुगडी धरुनीयां फेर;
रचूं या आरास चौरंगी चौफेर;
देऊं या घेऊं या प्रेमाचा अहेर
मिळून थोर लहान. १

अपुली धरती, अपुलें आकाश,
अपुला सागर, अपुला प्रकाश;
सुनील नभांत गुंजते रंगांत
खगांची स्वच्छंद तान. २

सुराज्यांत बाई नवी नवलाई;
तृप्त घरोघरीं विठ्ठ, रखुमाई;
शिरपेंचाहूनी जनामधें राही
भाळींच्या मोत्याला मान. ३

वादळाचें वारें घोंगावे जगांत;
शांतीचें चांदणें माझ्या माहेरांत.
मावेना आनंद दृष्टींत, देहांत;
वाटतें हरपे भान! ४

# ती आशेची कळी

निळया पर्करावरी काढिली
वेलबुट्टि पांढरी,
सुसाट माळावरी धावते
पोर एक गोजिरी.

केश मोकळे, भाव मोकळे,
कर कवळे नाचवी.
त्या माळाला जणुं स्थिरतेच्या
शापांतुन वाचवी.

जडता देहीं, जडता चित्तीं,
उभि मी परसामधें;
नयन मात्र अस्वस्थ धावती
घडिघडि माळाकडे.

ही आशेची कळी पाहतां
वाटे मज सर्वदा,
अजुनी नाहीं मानवतेची
सरली सुखसंपदा!

संग्रहालय, ठा.. स्वकमत.
२२०५४ वि: काव्य
क्रमांक ९३८६ नों: दि: ११/८/५८

# माझें-तुझें

माझा ओठांतला बोल,
तुझी आंतड्याची ओढ;
माझी नीरस करणी
तुझें ओलावतें वेड !

माझी विसराची रीती,
तुझे वेढणारे हात;
माझी मिणमिण वाती,
तुझी प्रज्वलित प्रीत.

माझी सुस्तावली भूमी
फुलें फुलविते चार,
तुझें आभाळ वर्षेचें
धरी समृद्धीची धार !

माझें-तुझें सारें कांहीं
असें विषम-वेल्हाळ;
माझी चंचल मासोळी
तुझें अनिवार जळ !

# तुझी स्नेहला स्मृती

जिवास माझ्या भुलवित राहे
तुझी स्नेहला स्मृती;
जीवनमार्गीं नित्य भेटती
तिच्या रम्य आकृती.

दिनांक बघतां, दर्शिकेंतली
तुझी कला हासते;
तव भावांची कोमलता मज
समजावुनि सांगते!

आवडत्या तुझिया प्याल्यांतुन
शर्बत मी ठेवितें;
प्याला नच तो, स्नेहपूर्ण तव
हृदय त्यांत पाहतें.

तुझा रेशमी रुमाल जवळी
घेतां कर कांपती;
तुझीं आंतरिक दुःखें स्मरुनी
लोचन पाणावती.

ही तव झरणी, झरतां झरतां
माझ्या वचनांतुनी
तुज रुचणाऱ्या हृद्‌भावांची
करित जाय पेरणी.

ही परसांतिल हिरवळ जेथें
तुझें प्रेम प्रगटलें;
सांजसकाळीं कातर कंपित
खिळति तिथें पाउलें !

एकांताच्या अंधारीं तव
स्मृतिचिन्हांचे दिवे
तेवत राहुनि सुचविति तुझिया
काय जिवाला हवें !

## आग

तुझ्या नि माझ्या भेटीची
आशा नुरली प्रत्यक्षांत;
आठवणींच्या हाकेनें
जागवुं बघतें तिज दिनरात.

तुझ्या आगळ्या मूर्तीशीं
जनीं न मज साधर्म्य दिसे;
छायाचित्रामधिं न तुझ्या
चित्ताचें चैतन्य दिसे!

कधिं बाळाच्या उद्‌गारीं,
ऐटबाज बांध्यांत कधीं,
भास तुझा होतो अधुरा
छकुल्याच्या जावळामधीं!

भास कशाचा! ती ठिणगी
उरीं धुमसते—धगधगते,
हें जळणारें जीवन अन्
स्मरणासहि जाळित सुटतें!

# सुट्टी

लागे सुट्टी !
मुलें पळालीं कशीं अन् कुठें !
इथें राहिला घरदाराचा
रिता पिंजरा !
भकास दोघे राखणवाले
सुखसंसारीं !
"बसुं झोल्यावर ?"—"गडे नको ना !"
"खमंग कांहीं, गोड जोडिला
बनवुन दोघें फक्कड जेवूं ?"
—घांस गिळेना !
"ही चटणी, आवडती बाळाची;
हा रस्सा, किति प्रिय बेबीला;
आणि शिरा, जीव पांखडी ताई त्यास्तव !"
माझीं बाळें, परक्या ठायीं
कांहीं खाती, कशीं झोंपती—
—घांस गिळेना !
अर्ध्या ताटावरुनि उठावें,
उंबरठ्यावर घोंटाळावें,
बघत रहावें अंवतींभंवतीं;
झाडाखालीं, नदीतटावर,
नाहीं किलबिल,
सारें निश्चल.
रिता पिंजरा घरदाराचा—
जसा सहारा !

# वास्तवाच्या वाळवंटीं

वास्तवाच्या वाळवंटीं
वास आहे आपुला;
येथ नाहीं साथ कोणी
तूं मला अन् मी तुला.

कल्पनांच्या येथ बागा,
घेउनीयां प्रीतधागा
स्वप्न-पुष्पांचा गळां मी
हार आहे गुंफिला !

प्रेरणांचे मंत्र गाऊं,
त्यांचिया बंधांत राहूं;
तेवत्या ठेवूं सदा रे,
भावज्योती आपुल्या !

छंद घेऊं संगतीचा,
खेळ खेळूं या गतीचा;
पार जाऊं सीमिताच्या,
स्वर्ग पाहूं तेथला !

वास्तवाच्या वाळवंटीं
वास आहे आपुला !

चि. २

# सुट्टी

लागे सुट्टी !
मुलें पळालीं कशीं अन् कुठें !
इथें राहिला घरदाराचा
रिता पिंजरा !
भकास दोघे राखणवाले
सुखसंसारीं !
"बसुं झोक्यावर ?"—"गडे नको ना !"
"खमंग कांहीं, गोड जोडिला
बनवुन दोघें फक्कड जेवूं ?"
—घांस गिळेना !
"ही चटणी, आवडती बाळाची;
हा रस्सा, किति प्रिय बेबीला;
आणि शिरा, जीव पांखडी ताई त्यास्तव !"
माझीं बाळें, परक्या ठायीं
कांहीं खाती, कशीं झोंपती—
—घांस गिळेना !
अर्ध्या ताटावरुनि उठावें,
उंबरठ्यावर घोंटाळावें,
बघत रहावें अंवतींभंवतीं;
झाडाखालीं, नदीतटावर,
नाहीं किलबिल,
सारें निश्चल.
रिता पिंजरा घरदाराचा—
जसा सहारा !

## वास्तवाच्या वाळवंटीं

वास्तवाच्या वाळवंटीं
वास आहे आपुला;
येथ नाहीं साथ कोणी
तूं मला अन् मी तुला.

कल्पनांच्या येथ बागा,
घेउनीयां प्रीतधागा
स्वप्न-पुष्पांचा गळां मी
हार आहे गुंफिला!

प्रेरणांचे मंत्र गाऊं,
त्यांचिया बंधांत राहूं;
तेवत्या ठेवूं सदा रे,
भावज्योती आपुल्या!

छंद घेऊं संगतीचा,
खेळ खेळूं या गतीचा;
पार जाऊं सीमिताच्या,
स्वर्ग पाहूं तेथला!

वास्तवाच्या वाळवंटीं
वास आहे आपुला!

# घर

माझ्या घराच्या समोर,
नजरेच्या आटोक्यांत,
तुझें मंगलाचें घर
उभें ठाकलें डोळ्यांत.

तिथें सकाळ रंगते
नामगानीं, संमार्जनीं,
शंखचक्र-गोपद्मांच्या
रंगाकृती-आलेखनीं.

तिथें किल्बील, झुळूझुळ
पांखरांची, वात्सल्याची,
वचनांत, भोजनांत
गोडी पांची अमृतांची

तिथें असंतोषासाठीं
आर्जवाचें सिंहासन,
गाढ स्नेहभावासाठीं
अगत्याचें आमंत्रण.

तिथें कणांना, क्षणांना
संस्कारांचा फुलवरा :
सुंदराच्या भाळावर
शुचितेचा बिचारा !

तिथें उमेसाठीं नित्य
होतो शंकर तपस्वी;
मनोमीलनांत तेथें
एकरूप स्वर्ग-पृथ्वी.

असें नित्य घेतां घेतां
तुझ्या घराचें दर्शन;
नवरसीं नाहतात
माझे भावुक लोचन.

## ओढ सांवळी

तोंड वासुनी मला गिळाया
भिंती चारहि उभ्या समोर;
अंधारीं पण दिसति न मजला
मुखडे त्यांचे लालस-घोर!

चराचराचें असीम मार्दव
अंधारीं जाणवे मला;
अंधारीं श्रवणावर येई
अमरत्वाचा गोड गळा !

पहांट होई प्रगट; तत्क्षणीं
अंधाराचें सख्य सरे.
छळिती मज भिंतींचे मुखडे
शोषिति माझें रक्त पुरें!

हेटाळत काळोख कोंवळा
प्रकाशास जग पूजितसे;
खुळया जगाचा ध्यास पांढरा,
ओढ सांवळी मला रुचे!

# पण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.

सुखसंवादाखातर
माझे आसावती कान
तुझा मोजकाचि बोल
मज आवडेना पण!

अगणित दोषांतून
निवडून घेसी गुण;
तुझ्या चोंचीचा आघात
मज सोसवेना पण!

नारळाच्या सायीपरी
तुझें हळुवार मन;
कवचाची कठिणाई
मज मानवेना पण!

अवसेच्या अंधाराचें
दूर सरावें काजळ;
चंद्रकोरीचें स्वरूप
डोळां दिसावें निर्मळ!

तुझी संयमित प्रीती
अशी वाटे संपादीन;
अपेक्षाचा अंतर्पट
दूर सरकेना पण!

# तूं नि मी

सख्य कुणाशीं?—एक तुझ्याशीं;
द्वैत कुणाशीं?—तेंहि तुझ्याशीं.

उरीं फुले अनुराग—तोहि तुझ्यास्तव;
विराग उसळे—तोहि तुझ्यास्तव.

नजर सदा मम तुझ्या भ्रुवावर;
चरणगतीला तुझाच आदर.

उणें-अधिक या जिण्यांत जें जें,
तुझ्या सुखाचे त्या दरवाजे.

तुझ्या नि माझ्या अचल मीलनीं
क्षितिजमनीं नभ-सागर-जुळणी

काल तूं नि मी, आज तूं नि मी,
उद्यां तूं नि मी, सदा तूं नि मी.

सर्वस्वाची अशी उठाबशी
प्रतिजन्मीं मी खेळें तुजशीं !

# ऋण

माझी हांक ऐकुनियां तूंच धावूनियां यावें,
सारें अवजड ओझें शिरीं वाहूनियां न्यावें.

माझे भाव कोमेजतां तूंच शिंपावीं आंसवें;
रससुगंधाचे भार शिरीं आनंदें झेलावे.

माझा राग शमवाया तूंच बनावें कोमल;
माझ्या दुर्बलतेसाठीं अंगीं सांठवावें बल.

माझ्या बोलांसाठीं सूर; तूंच घोळवावे कंठीं;
स्फूर्तीसाठीं उकलाव्या अंतरींच्या गुजगोष्टी.

माझें जगवाया जासी तूंच तुला विसरून:
माझें मागील जन्माचें का रे फेडितोस ऋण ?

# नको ताटातुटी !

निरंतर आहों आपण एकमेकांसाठीं:
जन्मजन्मींच्या या गांठी; नको ताटातुटी.

माथ्यावरलीं कुरळें आतां नाहिं राहिलीं काळीं;
गालीं, भाळीं, इथें तिथें सुर्कुत्यांचीं जाळीं;

आतां माझी आहे नाहीं गालांवरली खळी;
ओसरून गेली आतां अधरांवरली लाली.

मला सारें दिसताहे, सारें कळताहे;
तरी उरीं आकांक्षेचें फूल फुलताहे.

वाटताहे, अजून झटूं आराधनेसाठीं:
जन्मजन्मींच्या या गांठी, नको ताटातुटी !

"स्थित्यंतरें झालीं किती, तरी स्थिर राहूं;
विकसत्या जाणीवेनें जगाकडे पाहूं;

गावयाचें तेंच गीत जीवेंप्राणें गाऊं;
सहायाचें भलेंबुरें सुखेनैव साहूं."

तुझी-माझी प्रतिज्ञा ही आज स्मरताहे.
संचिताचें देणें-घेणें मज रुचताहे.

कळताहे तेज उभें तिमिराच्या पाठीं:
जन्मजन्मींच्या या गांठी, नको ताटातुटी !

# मौन

नितळ मुक्यानें वाहे पाणी,
वृक्ष मुके तीरावर दोन्ही;
निमुट तरंगति वरतिं पांखरें,
मुकें निळें नभ, मुकेंच वारें.

सळसळतांना ऊंस थांबला,
मुकाट मागें डोंगर बसला;
मुके मधुप, जग मुकें येथलें,
काळोखाचीं मुकीं पाउलें.

मनांत असुनी कांहींबाहीं
मूक उभीं आपण दोघेंही !

# तुज स्मरतें ना ?

एकवार आपुल्या जीवनीं
असें कांहिसें घडलें होतें;
ज्या घडण्यानें जिवाजिवाचें
जडून गेलें अभंग नातें.

'असें कांहिसें घडलें होतें'
आज अचानक स्मरतें मजला;
त्या स्मरणानें मनोमंडपीं
एक अनावर बहर चढविला.

त्या बहराची गंधरागिणी
झरत चालली कणाकणांतुन;
गंधतरंगीं विरली जाणिव
उरलें केवळ अबोध गुंजन.

तें गुंजन मम नयनीं नटलें,
भिडलें जाउन तव नयनांना.
'असें कांहिसें घडलें होतें'
हेंच या क्षणीं तुज स्मरतें ना ?

# मणी

आठवणीवर आठवण
(काळजाचा कण कण);
सरून जातात क्षण क्षण.
मणीच मणी गुंफायचे
फिरून आपले सोडवायचे—

झुलतो घोडे-पाळणा,
झुलतात पोपट, मैना;
राहतात मुकाट बसून
मिटले डोळे पाहून.
मोडकी फळी, फुटका चेंडू,
बाजा, सोल्जर, विटीदांडू,
माळयावरल्या खोक्यामधें
करतात झालं इकडेतिकडे.
बासनांत बसले बाळकपडे,
बाराखडी कोनीं पडे,
कमानींत रंगपेटी,
मोडकें रीळ—तार—गोटी.
म्हणतां म्हणतां उंची आली,
आवाजाला रुंदी आली;
विजारीवर फुल शर्ट
केसाचा तर नवा कट्.
शाळा, ग्राउंड, मित्रमंडळ,
तरी मनांत घरची कळ.
ताईजवळ उठाबशी,
माईजवळ घुस्साघुश्शी,

मुक्यांसाठीं छोटीजवळ
उठतां बसतां कासाविशी.
स्नानाआधीं तेलासाठीं,
झोपेआधीं गाण्यासाठीं,
सदानूकदा ठायीं ठायीं
हवी आई — हवी आई !
"अरे, लहान का तूं आतां ?
सरक, कुणी बघेल बरं का—"
तरीदेखील हुंदाडत,
कुशीमध्यें मान खुपसत,
बोलतो मुक्याच नजरेनें—
"असं ग काय आई"—म्हणे.
इकडे तिकडे मणीच मणी,
लाल, निळे, पिवळे मणी,
दूर त्यांचा माझा धनी.
आज—आत्तां—कुठें असेल ?
झोपत असेल ?—जागत असेल ?
हसत असेल ?—रुसत असेल ?
असूं दे जें जसें असेल.
माझा आपला एक नेम,
माझें आपलें एक काम :
लाल, निळे, हिरवे, पिवळे—
मणीच मणी वेचायचे
एकांत एक गुंफाय्‌चे—
गुंफाय्‌चे—उसवाय्‌चे...

: १ :

अशुभांच्या गर्तांतुन वाहे जीवनगंगा;
कोण तिला प्रस्थापिल शिवशीर्षांवर सांगा.
पाण्याचा रंग कसा?
ज्यामधिं मिसळे तैसा.
जीवन धवळेल जरी जाइल तें शिवसंगा!

: २ :

एक जरी ओळ मला स्फुरली दिवसाकाठीं,
म्हणतें मी—धन माझ्या खचितचि पडलें गांठीं.
ही माझी कोंडाकणि
सेवुनियां क्षुधित कुणी
आशेचें बी पेरित मानवतेच्या काठीं!

: ३ :

जगता, मज भान नसे मुळींहि तुझ्या हसण्याचें;
काय कथूं? भान नसे मज माझ्या असण्याचें.
जगतां बेफाट जिणें
पडतें मज विश्व उणें;
जडतें अन् वेड मला शून्यामधिं वसण्याचें.

: ४ :

गाण्याचें गोड वेड दिवसभरी मज जडलें
जें सुंदर त्यावर मी गाणें गुंफित बसलें
माध्यान्हावरतीं मी
गाणें रचिलें नामी,
अवगणुनी नकळत जग क्षुधित श्रांत बसलेलें.

: ६ :

जीवनलहरींवरतीं तरळावें वाटतसे;
विलगावें, विलगावें, ही आशा दाटतसे.
गुंगत—जीवन जीवन
फिरतें मी लोभावुन;
माझ्या शिरिं आरोहुन तें सुसाट दौडतसे !

: ५ :

स्नेहाचे कुंभ सतत या हातीं खेळविले,
प्राशुनि आकंठ किती इतरांवर वर्षियले.
या ग्रीष्मीं एकांतीं
तळमळतां दिनरातीं,
स्मरणाच्या मृगजळांत न्हाणें तितुकें उरलें !

: ७ :

तळपे रवि डोईवर ऊन पुढें झळझळतें;
दिपति नयन अभ्यंतर शुष्कतेंत तगमगतें.
नसत्या संध्या नि उषा,
नसती जर रम्य निशा,
तर असतें आदरिलें ऊनच हें रणरणतें !

# प्रीतीखातर

प्रीतीखातर वाटे मजला
अमृताहुनिही मधुर बनावें;
जीवनांतले दिन-घटका-क्षण
माधुर्यानें माखुन घ्यावे!

मधुर वदावें, मधुर हसावें,
रागलोभही मधुर करावे;
नित्य नवा फुलवीत जिव्हाळा
मधुर सुरावर गात फिरावें!

हृदयाच्या हृदयांत क्वचित् पण
घुसमटतें शंकेचें वारें:
जीवनसंगीताचें तुझिया
हेंच पालुपद असेल का रे?

# जीवन

जीवन झरझर सुकत चाललें:
जिरल्या अवखळ लाटालहरी;
कुमुदांचे तर केसर गळले;
पिचलें मानसपृष्ठ बिलोरी.

मालवल्या संध्या नि उषा अन्
अंतराळ जाहलें पारखें,
भूपृष्ठांतुनि उमळ उठे वर,
वरचें जग तिज झालें नवखें.

क्षितिजीं बुडली चैतन्यकला;
अंतरली सुषमेची संगत.
अर्ध्या वाटेवरी अडकला
अभिनवतेचा कलाकुशल रथ.

जीवन झरझर सुकलें; गेलें
वर्तमान भूतांत मिसळुनी;
काजळल्या अवकाशीं निश्चल
भविष्य पडलें गाढ झोपुनी !

# खूण

या शब्दांनीं मला खुणविलें
प्रथम आपुल्या सवें यावया;
आपुलकीनें वाहुनि नेली
अंतरांतली हिरवी माया.

यांच्या नादानेंच बहरला
द्राक्षवेलिचा मनांत मंडप;
यथासांग यांनींच करविलें
मधुररसाचें जनांत वांटप.

या शब्दांनीं मला दाविलें
भावार्थाचें विराट राऊळ;
सुलभ पदांनीं त्यांत फिरविलें
घडिघडि अर्पित मज अपुलें बल.

हेच शब्द मज आज सांगती
अपुल्यावाचुन पुढें जावया;
निःशब्दांतच दडली म्हणती
परमार्थाची गहिरी माया !

संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
22048 वि: काव्य
क्रमांक 9366 नों: दि:

# खोड

सदाचेंच आहे माझ्या खुलें दिलाचें कवाड;
सदाचीच आहें उभी गूढ कामनांच्या आड;

सदाचें ओठांवरी आहे आरतीचें गीत;
सदाचीच माझी अशी वेडिपिशी चालरीत.

जीवनांत सदाचेंच जाळें आहे टाकलेलें;
सदासदा गुंततात त्यांत किती मीन भोळे.

सदाचीच परी तुझी खोड क्षण गुंतण्याची;
तीर जवळतां, वेगें निसटून जावयाची !

# स्नेहतत्त्व हें

कुणी कसेही हसले, आणिक
आपसांत कांहीं कुजबुजले,
पडायचें ना त्यांमधिं अंतर
दोन जीव जे एक जहाले !

अडवितील मधिं खांचाखळगे,
चढण उंचशी कधिं वाटेवर,
निर्मळ ओहळ आपुलकीचा
पुढेंच जाइल तसूतसूभर !

भावफुलें हीं अगदीं साधीं,
रंगगंध त्यां नाहीं अद्भुत,
सौंदर्याच्या रक्षणार्थ परि
आत्मसमर्पण करितिल हासत !

दाहकतेमधिं नच सुकायचें,
अंधारीं नच छपावयाचें;
स्नेहतत्त्व हें असेंच अक्षय
मनांमनांतुन विलसायाचें !

# पारिजात

असा कसा पारिजात
वाढलेला वाटेवरी;
पहांटेच्या शुभ वेळीं
ढाळी आंसवांच्या सरी !

असे कसे लोक तरी
येती जाती मागें पुढें;
पायतळींच्या मोत्यांचें
त्यांना पडे ना सांकडें !

आणि मीही अशी कशी
आंसवांनीं वेडावतें;
सावलींत असूनही
अशी उन्हांत जळतें !

## नाद

सहज जुळविले शब्द, त्यांतुनी
सहज खुले अर्थाची माया;
सहजच होत्या सिद्ध भावना
त्या शब्दांना वेधुन न्याया.

जिण्यांत होती रसरसलेली
मस्ती सहजपणाची मोहक;
उद्रेकांतुन जिच्या उसळलें
सहजपणें वर प्रतिभामौक्तिक.

दोन हात नियतीसह करितां
ताठा सहजपणाचा गळला;
वठली मस्ती, जिरलें मीपण,
कर्तृत्वाचा पूर उतरला.

जीवनेंच मम मौक्तिक गिळलें;
कशी कुठें फिर्याद करूं मी ?
रित्या शब्दशिंपांचा निष्फळ
वृथा कशाला नाद धरूं मी ?

# खोल तळांत

नाहीं म्हटलें तरि तें आहे
अजुन जिण्याच्या खोल तळांत;
कधीं तरी क्षण अर्धक्षण मी
तया निरखितें नितळ निळ्यांत.

शुभ्र फुलांच्या मुकुटापरि तें
शिरीं उतरलें जणुं स्वर्गातुन;
अधिराज्याची धुंदी पटवित,
नटवित अमृतानें माझेंपण.

मी उन्मत्तापरी मिरविलें,
हासहासलें अतितृप्तीनें;
तोंच अचानक मुकुट होइ तो
माथ्यावरलें अवजड ओझें.

झुगारितां तें दूर हटेना;
चूर कराया ये कल्पांत !
हटलें, पण जें जडलें तें तर
अजुनि जिण्याच्या खोल तळांत.

# उपेक्षाच नेसण्या

बोललास ‘देइन’, गांठियली पायरी,
अति उत्कटतेनें पुढें पदर मी करीं;
तूं मग्न आपल्या स्वत्वामधिं पाहुनी,
घातली खुणेची सादहि ओशाळुनी.

हा हाय ! नकळतां फेंकिलेंस कांहिसें;
शरमेनें मेला जीवच जिथल्या तिथें.
तें अनोळखीपण, सहस्र कीं डागण्या,
का प्रीतिसतीला उपेक्षाच नेसण्या ?

## उगीच

करीं रिकामी घेऊनि झारी
उगिच उभी मी फुलबागेमधिं;
रुक्ष वल्लरी, रुक्ष फुलवरें
बघत गुंगतें अपुल्या नादीं!

मींहि शिंपिल्या, मींहि राखिल्या
एकवार या लतिकावेली;
लक्ष फुलवरे गुंफुनि माझी
एकवार मीं माळ गुंफिली.

कधीं सुमांच्या घोळक्यांत मी
भ्रमरासम गुणगुणलें कांहीं;
त्याचा मधुमय नाद सुगंधी
अजुनि मनीं झंकारत राही.

हाय! कशा वठलांत लतांनो!
कवणाच्या शापानें जळलां?
उगाच जगतें, मीही जळतें,
दूर पाहतें रसघन वळला!

## कधीं कधीं

कधीं कधीं पथिं कातरवेळीं
अनिमिष दर्शन, मधुसंवेदन;
कधींमधीं एकांतीं कंपित
स्निग्ध करांचें हस्तांदोलन.

कधींमधीं हें घडतें; तरिहि
कायेवर रोमांच सदाचे;
उरांत आणिक अक्षय ठोके
कधींमधींच्या आठवणींचे !

# आभाळ

सारें कांहीं जमलेलें
      कसें विरसून गेलें ?
आज अचानक कां रे
      असें आभाळ भरलें ?

फुलूं पाहणाऱ्या कळया
      गेल्या मिटूनियां कोषीं;
हलूं पाहणारें जळ
      स्तब्ध राहिलें तळाशीं !

स्थिरावली पानांतच
      धीट गिर्की पांखराची;
दडे लकेर चोंचींत
      भीती घेत आभाळाची !

# कात्री

नाहिं म्हणावें तर त्या ठायीं
चित्त सारखें गुंजत राही;
होय म्हणावें तरी तिथें तें
दीर्घकालवर ठरतचि नाहीं.

नाहिं म्हणावें तरी स्मृतीनें
वृत्तींवरतीं येइ पालवी;
होय म्हणावें तरी तिच्यावर
फूल कसें तें उमलत नाहीं.

'होय-नाहीं'च्या कात्रीमधिं मी;
अंतरालिं कुणि झोल्यावरतीं
पुसतें मजला—"धुळीस जाऊं?
अथवा जाऊं वरतीं वरतीं?"

# शंकिता

भाववेगें येउं पाहे मी तुझ्या रे मंदिरीं;
साद तूझी ती खुणेची येइना श्रवणावरी!

तिष्ठलीं दारें सदांचीं जीं प्रतीक्षेमाजिं, तीं
बंद झालीं; संभ्रमें या आज भांबावे मती.

धुंदिनें भारावलेले नेत्र तूझे स्वप्निल,
भावगंधें वेष्टिलेले बोल तूझे मंजुळ,

मग्नता ती चिंतनाची, ती वृथा अस्वस्थता,
—स्मरत सारें; झुरत राहें विरहिणी मी शंकिता!

जीव माझा सानुला, रे, प्रीत माझी थोरली;
लक्षपुष्पांनीं तुत्रां ती गंधवोनी ठेविली.

गंध का होई नकोसा? म्लान कीं झालीं फुलें?
कोण कैसें पेटवीतें भाग्य माझें आगळें?

कोठली पडसाद? तूझी साद येईना जरी:
हरपलें कीं रत्न माझ्या जें रुळे वक्षावरी!

## तीच काय मी ?

तीच काय मी, तुझ्या पथावर
जिनें पसरिली छाया,
तुझ्या पदींचा दाह साहुनी
जिची डंवरली काया ?

तीच काय मी, जिनें चोरिली
जाग तुझ्या चिंतांची,
मिटल्या नयनीं तुझ्या फुलविली
माया स्वप्न-फुलांची ?

तीच काय मी, जिची रागिणी
तुझ्या बिलगली कवना ?
तीच काय मी, श्वास जियेचा
तुझ्या स्पर्शला प्राणा ?

तीच काय मी ? दुजीच अथवा
आज इथें एकांतीं
अश्रूंच्या डोहांत विझवितें
धगधगत्या स्मृतिज्योती ?

# अमृतकथा

तुझ्या मुखांतुनि ऐकितांच ती
पुनश्च अमृतकथा,
जीवनपरिसर घुमवुनि गेला
गंधर्वांचा जथा.

अणुरेणूंच्या निरांजनांतुनि
लक्षवात झळकली;
गोपुरापरी तेजशिखांनीं
काया ओथंबली.

शिरिं मणिमंडित नगशैलांची
मिरवित छायावली;
सुभावनांची मंदाकिनि
अतिवेगानें चालली.

अष्टदिशांतुन परिमळ आला
वृत्तिवल्लरींवरी;
प्राणपद्म विकसलें शतदलीं
ओतित रसमाधुरी.

हृदयेशा! यापरी तपाची
हो अवचित सांगता,
तुझ्या मुखांतुनि ओघळतां ती
पुनश्च अमृतकथा.

# नाहीं आतां

नाहीं आतां ठेवणार
मोहपाशीं गुंतवून;
नाहीं कांहीं मागणार
मीच आपुली देईन.

नाहीं घालणार मनीं
वियोगाचा ताळमेळ;
नाहीं पुसणार कधीं
पुनर्भेटीचा सुकाळ.

नाहीं ओठीं आणणार
शल्य मनीं सलणारें;
नाहीं नेत्रीं दाविणार
भाव मनीं झरणारे.

वेदनेच्या कांटयांमधें
प्रेमपूर्तीचा गुलाब:
कांटयांविण फूल हातीं
असा घडवीन लाभ !

# स्वप्न !

"हे असेच असतिल हातीं आपुले हात;
ही अशीच राहिल रम्य रेखली वाट;
हा असाच राहिल थाट रुपेरी वरचा;
ही अशीच किलबिल; हाच जोम चरणांचा !

ऋतु हाच जगीं; मार्गांत सोबती हेच;
नवबहर फुलवितिल आशातरु असलेच;
शीतोष्ण झरे हे असेच अनुभूतींचे;
हीं अशींच अधरीं सुंदरतेचीं गीतें !

हीं अशींच पानें मम जीवनग्रंथाचीं;
अन् पानोपानीं हीच कथा—तृप्तीची !"
या स्वप्नावरतीं मी अनुदिन अनुरक्त;
तें दूर तरळतें अनिर्बंध अव्यक्त !

# स्मरण्याजोगें

सारें विसरुन उभी तिथें मी
तसेंच कांहीं स्मरण्याजोगें
घडवायाचें मनांत योजुन.

नव्हती हिरवळ पायीं,
नव्हता चंद्रम डोईं,
नव्हतें पटल धुक्याचें,
कूजन धुंद पिकांचें,
कलरव ना सारितेचा,
संयोग न हंसांचा,
मदिर सांजही नव्हती,
नव्हती न्हात उगवती,
—नव्हतें कांहीं...कांहीं.

आणि तरीही—
अकस्मात त्या अनोळखी सृष्टीची
धीट अनावर साद ऐकुनी
नकळत, नवलत घडवुनि बसलें
स्मरण्याजोगें तसेंच कांहीं !

## झुलतां झुलतां

कालच निद्रावनांत रात्रीं
सौरभ स्वर्गीचा दरवळला;
होतें का तें भाग्य अलौकिक
कीं बहराचा भासच सगळा ?

वेल अंकालीं—अन् अस्थानीं—
उपेक्षेंत जी यास्तव झुरली,
तीच वसंतीं—स्वप्न-वास्तवीं—
अशी कणकणीं डंवरून आली?

स्वप्नच तें !—पण त्यावर झुलतें
खुळें मनाचें फूलपांखरूं;
झुलतां झुलतां उल्हासुनि अन्
अंतराल पाहतें आवरूं !

# एक सुरांत मजेनें

पांखरांचे पंख घ्यावे
उंच आकाशीं उडाया;
उडतांना जडतेचें
दडपण विसराया.

चांदण्यांचें तेज घ्यावें
गाढ अंधारीं फिराया;
फिरतांना सारीकडे
हसहसून पहाया.

रस-सुगंध सेवावे
फळाफुलांचे अमोल;
अंतरींच्या क्षुद्रतेचा
द्याया घालवून तोल.

आणि मग जगांतले
मेळवावे स्वर-वृंद;
एकसुरांत मजेनें
गावा अनंताचा छंद!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९३९२

# क्षितिजावरतीं

दिसभर संगें संगें असुनी
मला वाटतो दिनमणि परका;
रोमांचफुलें फुलवी तरिही
स्पर्श तयाचा मला अनोखा.

निद्रेमधुनी, स्वप्नामधुनी
अमृतरस पाझरवी गात्रीं,
वाटे मजला चंद्रमाच तो
युगायुगांचा मम सहयात्री.

ए कहात रविकंठीं ठेवित,
दुसरा गुंफित चंद्रकरांतुन,
श्रांत उभी मी क्षितिजावरतीं
कधीं उषा, कधिं संध्या होउन !

# छंद

नित्य नवा छंद मला, नित्य नवा छंद !

हिरवळ मी माळावर झुळझुळतें, सळसळतें;
कलिका मी उपवनांत फुलतें अन् परिमळतें;
वृक्षलता गिरिकुहरीं; अग्निमुखीं मी जळतें;
विलयीं आनंद मला, विलयीं आनंद !

पाकोळी अंगणिं मी भिरभिरतें, बागडतें;
कोटरांत पक्षिणि मी घांस पिलामुखिं धरितें;
मत्त विहंगम गगनीं इंद्रपुरीला भिडतें;
मी गतिनें धुंद, सदा मी गतिनें धुंद !

लहर जळावरली मी झुळझुळतें, ओघळतें;
सप्तसुरी वीणा मी रुणझुणतें, दुमदुमतें;
कविमुखांत रागिणि मी अनुभूति पालवितें;
जीवित मधुगंध मला, जीवित मधुगंध !

आंसवांत द्रवतें मी, मुक्तहास्यिं मोहरतें;
पतनामधिं लवतें; मी आरोहणीं ताठरतें;
परकेपणिं रमतें मी मीपणांत रसरसतें
रिझविति हे बंध मला, रिझविति हे बंध !

# इथें

इथें एकिली हाक दिली जी
गंधवतीनें समीरणाला;
इथें निरखिला जलवंतीचा
नीरव आकाशासह चाळा.

इथें वेढिलें स्वरलहरींनीं,
निःश्वसितांनीं, स्पर्शफुलांनीं,
अर्धलाजऱ्या जाणिवेस अन्
इथें दुखविलें मदनशरांनीं.

इथें स्वर्ग माझ्यास्तव झुरला;
त्रिकाल हसलें क्षितिज मजसवें;
इथें नियतिनें मोजियले अन्
अदृष्टांतिल निखळते दुवे.

इथें लागला थांग नभाचा;
उलगडली ताऱ्यांची भाषा;
गहन तमाच्या तळांत बुडतां
उरिंची अचपल विद्युत्‌रेषा

इथेंच घुसमटतां ती वळुनी
पाताळांतरिं शिरली निथळत;
अजुन इथें हें विवर मनाचें
जळत्या गीतरवांनीं नाहत.

# ओझें

ओझें जीवनस्वप्नांचें !
गंधि फुलांचें, तरल पिसांचें,
अनंतवर्षी रत्नमण्यांचें.
हुंगत, गुंगत,
चुंबित, मिरवित,
कधीं फिरावें शिरीं लेवुनी
ओझें जीवनस्वप्नांचें !

आषाढींच्या घनापरी कधिं
अवजड वाटे;
कधिं पौषांतिल थंडीपरि उरिं
उठवित कांटे;
संथ नीलसर कधीं झिरपुनी
नसांत दाटे;
कधीं पदतलीं ग्रीष्मधूलिपरि
ऊष्ण चटचटे !

वाटे टेकिन—
वाटें टेकिन, कधीं कुणाच्या
सोप्यावर अथवा वृंदावनिं,
तरूतळवटीं, सरितापुलिनीं,
वाटें टेकिन ! जरा विसाविन;
मिटल्या नयनीं निवांतपणिं क्षण
वास्तव पाहिन !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ५५ 22048 विः ०३।०५
क्रमांक 7366 नोंः दिः 77148

छे! पण कुठलें माथ्यावरुनी
उठावयाचें?
म्हटलें तरि ना हटावयाचें,
हसावयाचें, रुसावयाचें;
मात्र दिननिशीं
असेंच या शिरीं वसावयाचें:
चेटुक जणुं तें अलौकिकाचें.
ओझें जीवनस्वप्नांचें!

# गांठ

धरेंत काळी रात्र असावी;
उरांत काळी खंत असावी;
परंतु काजळकांठावरतीं
तुझी मनोरम मूर्त असावी.

झांकळलेल्या अवकाशामधिं
तुझी रुप्याची झांक असावी
कडाडत्या घनगर्जनेमधीं
तुझी सुकोमल हांक असावी.

काळरात्रिच्या पद्‌यात्रेला
पूर्वेकडली वाट असावी;
ओघळणाऱ्या स्मृतींस माझ्या
तुझी खुणेची गांठ असावी !

छे! पण कुठलें माथ्यावरुनी
उठावयाचें ?
म्हटलें तरि ना हटावयाचें,
हसावयाचें, रुसावयाचें;
मात्र दिननिशीं
असेंच या शिरीं वसावयाचें :
चेटुक जणुं तें अलौकिकाचें.
ओझें जीवनस्वप्नांचें !

# गांठ

धरेंत काळी रात्र असावी;
उरांत काळी खंत असावी;
परंतु काजळकांठावरतीं
तुझी मनोरम मूर्त असावी.

झांकळलेल्या अवकाशामधिं
तुझी रुप्याची झांक असावी
कडाडत्या घनगर्जनेमधीं
तुझी सुकोमल हांक असावी.

काळरात्रिच्या पद्यात्रेला
पूर्वेकडली वाट असावी;
ओघळणाऱ्या स्मृतींस माझ्या
तुझी खुणेची गांठ असावी !

# उगाचच

अशी उगाचच बसल्या बसल्या,
बोलत असतां, न बोलतांही,
उगा स्वतःशीं हांसत असतां,
रुसतां कारण नसतांनाही—

अशी उगाचच संचरतांना
राजपथांतुन—वनरानांतुन,
रानपांखरापरी अनावर
साद घुमवितां दिशेदिशेंतुन—

अशी उगाचच व्याकुळतांना,
नवसंवेदन अनुभवतांना,
अबोध कांहीं चितारतांना,
हें करतांना—तें करतांना—

—असा उगाचच मला वेढिसी !

निराकार तूं ! तरि आकारत
मला वेढिसी असा उगाचच;
अनंत असुनी माझ्यापुरता
उरसी एकच—असा उगाचच !

# माझ्या आशा

हवे वाटले पंख रुपेरी
रुप्यांत घ्याया झेप पांढरी;
हवी वाटली सुवर्णचंचू
सूर्यफुलीं रोवाया अधिरी.

धवळया पिवळया माझ्या आशा
काळ्या मातिंत रुतल्या; तरिही
हिरव्या पात्यांमधुनि निघाल्या
गात भरारत दिशांत दाही !

# असें न व्हावें

असें न व्हावें—
हसें अहेतुक पाहुनि मम तूं
अति आशेनें उरीं फुलावें;

असें न व्हावें—
बेसावध बोलावर मम तूं
धुंद झुलावें,

असें न व्हावें—
संध्यारंजित आकाशीं तूं
मला पहावें;
जळवंतीचें गीत निळें तूं
मलाच गावें;
अन् वासंतिक परिमलांत तूं
मज वेढावें;

असें न व्हावें—
ध्यासांतुन, भासांतुनि मम तूं
तूं न रहावें !

# थाट आगळा !

अवर्षणांतुनि सुटुनि अचानक
अशी सुखानें न्हातें न्हातें;
कंठांतुनि झिरिझिरी सांडतीं
परोपरीचीं परिमलगीतें.

कधीं पदतलीं विश्रम हिरवा;
क्षितिजावर कधिं कवन केशरी;
विराट काळया तंद्रीवर कधिं
स्वप्नांची चमचम चंदेरी.

थाट आगळा असा, तशांतच
नांव तुझें रसमय अधरावर;
या स्वर्गाची येइल का कधिं
कल्पनेंतल्या स्वर्गाला सर ?

# म्हणूं कशाला ?

म्हणूं कशाला येइन फिरुनी
सदाचीच जर आलें आहें;
रूप तुझें नजरेंत नवोनव
सदाचीच जर ल्यालें आहें;

स्फूर्तीचा पारिजात अक्षय
तुझ्या सुशोभनिं रमतो आहे;
गंधित जीवितधूप अखंडित
तुज आकारत भ्रमतो आहे;

स्वरभावांचा धागा अविरत
तुझें प्रभूपण विणितो आहे;
अहंभाव तव संनिध अक्षय
निरांजनिं मिणमिणतो आहे.

म्हणूं कशाला येइन मी, जर
तुझीच केवळ झालें आहे;
काल-उद्यांना ओलांडुनि मी
आज होउनी आलें आहें !

# असलें वादळ—असली शांति

अखेर सरलें कराल संगर,
म्यानबंद झाल्या तलवारी;
सूर सनइचे घुमूं लागले,
निमुट राहिल्या कर्णे-भेरी!

सरलें संगर, विरलें वादळ,
धूळ थकुनिया बसली खालीं;
जिथें उडालें छप्पर तेथें
पुन्हां लागली पडूं सांवली!

सीधी झाली भुवइ वांकडी,
शब्द गिळाया मिटला जबडा;
विद्वेषावर पडली चादर
जो फिरलेला नंगा-उघडा!

घरोघरींच्या अजाणतेला
मिळे खेळण्या एकच अंगण;
वखवखलेल्या भुकेस लाभे
तुकडा तुकडा चतकोरांतुन!

अशीं वादळें, असली शांती,
कृतिनंतर ही अशि विश्रांती;
"इष्टक्रम हा" म्हणत—जाहली
मग्न चिंतनीं माता नियती!

# स्त्री माझें नांव

नव्या-जुन्या सीमेवर माझें मज स्थान दिसे;
संस्कृति मी जणुं समूर्त, स्त्री माझें नांव असे !

गृहिणी मी, कष्टतसें वृद्धांस्तव, बालांस्तव;
सुलभ मला पतिप्रेमा; दीनांचा मज आठव;
सदनाहुनि स्वर्ग फिका—हेंच स्वप्न पाहतसें !

शिक्षक मी, ज्ञानाची चिर मजला अभिलाषा;
अणुअणूस आकळते बालमनाची आशा;
ध्येय हाच देव मला, अक्षय त्या पूजितसें !

मी विनम्र सेवक, जनिं सेवाव्रत चालवितें;
अश्रूंतुन हास्याचे शत अंकुर पालवितें;
कर्म हाच धर्म जगीं, तोच मला तारितसे !

कलावती मी, माझी नितनूतन अनुभूती;
सुंदरतापूजक मी, तीस्तव मम अभिव्यक्ती;
मी उन्मन, चिर अथांग रसरंगीं नाहतसें !

शास्त्रज्ञा, वाहत मी संशोधनकार्य धुरा
नारायणरूप शास्त्र देइल कधिकाळीं नरा:
संजीवनिमंत्र तेंच—ही श्रद्धा दाटतसे !

मी कांता, मी माता, शिक्षक मी, सेवक मी,
कलावती, शास्त्रज्ञा, विविधगुणीं नटतें मी;
विश्वाची मी प्रतिभा, मजमधिं समृद्धि वसे;
संस्कृति मी जणुं समूर्त, स्त्री माझें नांव असे !

# प्रश्न कशाला ?

प्रश्न कशाला, कशास उत्तर ?
कधींच तें तर फुटलें आहे,
फुटलें तरिही या जिण्यांतलें
सार तयांतच नटलें आहे.

पुकारलें ज्या कधिंही नव्हतें,
असें अनामिक हसलें कांहीं;
दिपून जावी लौकिक दृष्टी
असें अलौकिक दिसलें कांहीं.

क्षणभर गेली भ्रांत घेरुनी
शुद्ध देउनी चिरकालाची;
अमरत्वाला कसली पदवी ?
आणि परीक्षा तरी कशाची !

## लग्नसराइ

उष्टीं भांडीं खरडत बसल्या
मोलकरिणि या अर्ध्यापोटीं;
वणवणते मांडवांत त्यांची
आसुसलेली नजर चोरटी.

उजविकडे उतरंड थोरली
तवा-तपेल्या-पातेल्यांची,
डाविकडे ती चळथ उंचशी
निष्कलंक ताटावाट्यांची.

वाट्यांमधुनी रस अंब्याचा,
ताटामधिं दहिभात नि भाज्या :
यजमानाच्या आतिथ्याच्या
खुणाच मागें उरल्या ताज्या.

पलिकडल्या खोलींतुनि उठती
हास्याच्या लाटांवर लाटा;
गलबल्यांत फोनोही उचली
फिरूनी फिरूनी अपुला वांटा.

आंत नववधू लाजत करिते
मुकीं खलबतें पतिराजांशीं!
मधुचंद्राला कुठें जायचें?
निघावयाचें कुठल्या दिवशीं?

समारंभ हा पाहत बसली
वडारणींची दारिं भुतावळ;
तिचिया कर्कश रडगाण्यांनीं
निघतें गर्जुन तें लग्नस्थळ.

नजर चोरटी—मुकीं खलबतें—
ते ढेकर—"वाढा हो माई!"
विसंवाद यांतला ऐकिते
मिटल्या कानीं लग्नसराई!

## लग्नसराइ

उष्टीं भांडीं खरडत बसल्या
मोलकरिणि या अर्ध्यापोटीं;
वणवणते मांडवांत त्यांची
आसुसलेली नजर चोरटी.

उजविकडे उतरंड थोरली
तवा-तपेल्या-पातेल्यांची,
डाविकडे ती चळथ उंचशी
निष्कलंक ताटावाट्यांची.

वाट्यांमधुनी रस अंब्याचा,
ताटामधिं दहिभात नि भाज्या:
यजमानाच्या आतिथ्याच्या
खुणाच मागें उरल्या ताज्या.

पलिकडल्या खोलींतुनि उठती
हास्याच्या लाटांवर लाटा;
गलबल्यांत फोनोही उचली
फिरूनी फिरूनी अपुला वांटा.

आंत नववधू लाजत करिते
मुकीं खलबतें पतिराजांशीं!
मधुचंद्राला कुठें जायचें?
निघावयाचें कुठल्या दिवशीं?

समारंभ हा पाहत बसली
वडारणींची दारिं भुतावळ;
तिचिया कर्कश रडगाण्यांनीं
निघतें गर्जुन तें लग्नस्थळ.

नजर चोरटी—मुकीं खलबतें—
ते ढेकर—" वाढा हो माई ! "
विसंवाद यांतला ऐकिते
मिटल्या कानीं लग्नसराई !

# तुझें ऐकुनी कवन

तुझें ऐकुनी कवन मनोरम
संध्या अधिकच झाली कातर;
विरल्या नकळत प्रकाशरेखा
निशा उतरली नील नभावर.

गूढ गहन आशय शब्दांतिल
ऐकुनि तरु छायामय बनले;
बघतां बघतां अवकाशाला
पडूं लागलीं तारकस्वप्नें !

स्मृतीवरी ऋतु सहा तरळले
गीत गात अति सुरस सचेतन,
गंधरवांनीं अंतर भारित,
शृंगारित...अभिमंत्रित जीवन !

तुझें ऐकुनी कवन सुकोमल
द्रवलीं नयनांतलीं आंसवें;
हास्य जाहलें अधिक मुलायम :
रसारसांचीं जुळलीं वलयें.

# ऐन रात्रिला

ऐन रात्रिला नीज पळाली
नयनांना दावित वाकोल्या;
रंगमहालीं नटति नव्यानें
प्रणयाच्या कळसूत्रि बाहुल्या!

ऐन रात्रिला गहन रम्यता :
संसाराच्या मध्यावरतीं
आसक्तीचे दीपक विझले,
उरे सुखाची शामक कांती!

ऐन रात्रिला उघड्या नेत्रीं
समूर्त स्वप्नांचें रसचिंतन,
नीलिम्यांतलें अबोल उज्ज्वल
नक्षत्रांचें गीत सनातन!

ऐन रात्रीं?—छे, सरत्या रात्रीं
गगनिं उषेचें रजत निमंत्रण;
अवघडलेल्या अणुरेणूंवर
मिठास निद्रेचें अवगुंठन!

# या इवल्या हातांनीं

परोपरींच्या तुझ्या जगीं मज रोज रोज तूं नेसी;
या इवल्या हातांनीं देवा घेउं किती जें देसी.

काळोखाच्या डोहामधुनी जागुनि येतां वरतीं
सुरगंगेंतिल सोनकमळ जणुं बघतों रविबिंबासी.

अंवतींभवतीं तरूतरूंतुन किलबिल श्रवणांसी,
मुदें हुंगितों फुलांफुलांतिल दरवळल्या गंधासी.

रुचीरुचीनें अन्न सेवितों, घेतों सुखनिद्रेसी;
ज्ञान जगाचें घेतों; रमतों सेवित या सुखराशी.

सुखसंवादीं रमविलि मजला लावुनियां हृदयासी;
'स्मरण असूं दे' गीत एवढें नकळत गाउन जासी.

तुझ्याच जगतीं अम्हासंगतीं मैत्र कराया येसी;
या इवल्या हातांनीं देवा घेउं किती जें देसी.

# हे परमात्मन्

हें वैरानें लडबडलें जग
  कुटिल क्रूर लालस समरांगण;
अथांग करुणाजलिं, परमात्मन् !
  न्हाणि तया, करि सोज्ज्वल, पावन.

हे दयानिधी, भाग्यविधाता !
  शांतिसौख्य दे संत्रस्तांप्रत !
उचलि वरद कर, शुभं भवतु वद,
  करि स्थिरचर सुंदर, संवादित !

हे विमुक्त, गंभीर, गुणाकर !
  दे विराग, घे खुडुनि अहंपण;
ज्ञानकिरणिं जागवि जननयनां,
  नष्टांतरिं करि जीवित-संभव !

चिरंजीव प्रभु, चिरमंगलमय !
  गाउनि रसमय गान सनातन,
जीवभृंग तल्लीन ठेविं नित
  प्रेमपाशिं निष्काम, निरंजन.

# आज मी

प्राप्त झाल्या अद्भुताच्या
  आज मी भानांत नाहीं;
असुनिही अति निकट, तूझ्या
  आज मी ध्यानांत नाहीं.

यौवनाच्या आरतीच्या
  आज मी गजरांत नाहीं;
या बसंती वैभवाच्या
  आज मी बहरांत नाहीं.

वृष्टिच्या या पर्वकाळीं
  आज मी तृष्णेंत नाहीं;
संगमीं स्वप्नांचिया रे,
  आज मी निद्रेंत नाहीं.

जीवघेण्या कामनेच्या
  आज मी पाशांत नाहीं;
विश्वव्यापी वेदनेच्या
  आज मी कोषांत नाहीं.
आज मी भानांत नाहीं.

# बहाणा

स्वप्नामध्यें येसी तेव्हां
सुधेपणाचा करिसि बहाणा ;
जागेंपणिं कां पदोपदीं मग
घालित जासी खुळा उखाणा ?

'समांतरांना मीलन कुठलें ?'
हें मी वदतां मान तुकविसी ;
'संयोगाची वाट आपुली'
कां डोळ्यांनीं सांगत बससी ?

'जोपासत अपुलालें राहूं,
पाहूं अवघ्यांमधें स्वरूपा.'
हें मी वदतां—बिलगत पुससी,
'स्वरूप एकच, मग अंतर कां ?'

मिटुनी जातें मम जागेंपण
ऐकुनि असला लाख उखाणा ;
निर्जेत पुनरपि वठूं लागतो
सुधेपणाचा तुझा बहाणा !

# होती आशा

तुझ्याहुनी तूं असमि वेगळा
हें नव्हतें रे, मजला माहित;
नातरि मिटवुन द्वैत आंतलें
आलें नसतें पदिं मी धांवत.

होती आशा—करांत घेशिल
उरीं लावशिल 'जिवलग' म्हणुनी;
ठेविलेंस चरणींच खिळवुनी—
अशी तुझी रे विपरित करणी !

## रेघ पुसटली

नक्षत्रांचे अन् चंद्राचे
नकोत मजला लाख दाखले;
हवी मला ती माती जीवर
माझें पहिलें स्वप्न रेखिलें.

जरि सर्वांचें निगूढ नातें
क्षणाक्षणाला मज जाणवतें,
त्या मातीच्या गंधास्वादा
तरिही माझें भान धांवतें.

माझ्या स्वप्नांवरला मोहर
कुजबुजतो ताऱ्यांच्या कानीं;
मुळें तयांचीं गुंतुन पडलीं
हिरवळलेल्या गंधित रानीं.

पाय भुईंतुन माझे ढळले,
आभाळाची सुटली दोरी,
स्वप्नाकृतिची रेघ पुसटली,
आली डोळ्यांवर अंधारी.

विनवुं कुणा मी आणि कशापरि
लेवविण्या मज तें माझेंपण,
ज्यावर केलें प्राणरसें मी
पहिल्या स्वप्नाचें आलेखन.

## भासच !

कुठें काय ?—कांहीं नाहीं.
तो ना ? तो तर होता
फटींतून आंत चुकलेला
प्रकाशाचा एक इवलासा भास !

त्यानेंच उठवलें का
निजलेल्या कळ्यांना ?
त्यानेंच खुलवलें का
जागलेल्या गळ्यांना ?
त्यानेंच नटवलें का
तळ्यांना—मळ्यांना ?
दिशांच्या पडद्यामधून
त्यानेंच नादवला का
एक रेशमी आरोहावरोह ?

तोच असेल तो
इवलासा चुकार भास,
भासच !

# या वळणावर

ती नाहीं मी, ही मी दुसरी
उभी विसावत या वळणावरि !

रसरसणाऱ्या त्या हर्षोत्कट
जिनें उधळिल्या गीतलकेरी,
हेमंताच्या राजवटींतहि
जिनें निर्मिली सुगंधनगरी,
काजळकाळ्या क्षितिजकडांवर
जिनें रेखिली रेघ रुपेरी,
रसिकरंजनी, यौवनमुग्धा,
—सचेतनाची जणुं ललकारी—
ती नाहीं मी—ही मी दुसरी !

पाहत जी आसावुन भंवतीं
लुप्त कुठें तो जुळलेला कर,
साद घालिते क्षणाक्षणाला
उमटविण्या खंडित प्रीतिस्वर;
उजळित जी स्वप्नांतच केवळ
चिंतियल्या ध्येयांचें गोपुर,
भग्नमनोरथ, वंचित, शापित,
श्वासमंत जाळित जळणारी—
ती नाहीं मी, ही मी दुसरी !

विसरुन गतकालाचें तांडव
विसावते जी या वळणावर,



संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
22048 दि: ०३।०५
क्रमांक 9366 नों. दि: 11/6/50

नयनांना दाखवीत कल्पित
भविष्यवेलीवरला मोहर,
प्रशांततेच्या उदरीं पाहत
खळखळणारा जीवननिर्झर,
त्या दोघींहुनि जरा निराळी,
चिरंतनाला अनुसरणारी,
ही मी दुसरी, या वळणावरि !

# राधेश्याम

रामा, भामा, ऐस कुणी तूं;
मी तर राधा गोकुळांतली,
श्वासाश्वासासवें जिनें ती
मुरलिमनोहर कथा गुंफिली.

कालिंदीच्या लक्ष तरंगीं,
वेळूंच्या रोमारोमांतुन,
वायूच्या शतशत लहरींवर
मींच ठेविलें हरिला रेखुन !

खुशाल कवळा करीं हरीला,
आणाशपथा लटक्या घालित;
राधेमागुन श्याम धांवतो
युगायुगाला करीत कुंठित !

# दैन्य

ती ओठांची मुरड वेगडी,
तो हास्याचा विटका तुकडा,
दूरत्वाची कथा सुनावित
फिरणारा तो रटाळ पाढा !

अशी तशी मी याचक नसतें,
स्वल्प न माझी असत अपेक्षा,
दैन्य न माझें असें—सरे जें
स्वीकारुनियां असली भिक्षा !

कां देहाला ओढ अशी मग ?
कां प्राणांची होते ओंजळ ?
कां लवतें मी वर्षत असतां
माथ्यावर तें अमाप मृगजळ ?

## व्यथा

आजच तुटली गमलें, पण ती
माळ कधींची तुटतच होती;
धागा धागा कुठें कुणीसें
ओढित होतें हलक्या हातीं.

आज ढळे जो तारा, तो तर
कधींपासुनी ढळतच होता;
गीत विरे जें आज, तेंहि तो
हात कधींचा रोधित होता.

माझ्या विश्वामधें धुमसते
त्या हाताची व्यथा अकारण;
त्या पुष्पांचें, त्या तेजाचें,
त्या गीताचें असें विस्मरण !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक 22048 वि: काव्य
क्रमांक 7328 नों: दि: 11/8/58

## बंध

कधीं नव्हे तें येउन जवळीं
कानामधिं तूं कुजबुज केली ;
निरखित गालावरली लाली
ओष्ठदलांशीं सलगी केली ;

हातीं धरुनी, हितगुज करुनी,
वनरानांतुनि नेलें विहरत ;
कधीं नव्हे तें मज गुंगविलें
नसोत साखरतंद्री पेरित.

कधीं नव्हे ती भारुनि गेलें ;
चिंतनरंगीं रंगुनि आलें ;
कधीं नव्हे तें सर्वांगावर
सुखस्मृतींचें चंदन ल्यालें.

कधीं नव्हे तो परतुन येसी ;
बळें सांगता करून घेसी ;
कधीं नव्हे ती बांधुनी बसलें
नसत्याला असत्याच्या पाशीं

REFBK-0009392
REFBK-0009392

# दिसे ना दिसे

दिसे ना दिसे असें कांहिसें
तुझ्या नि माझ्यामधें आडवें ;
सूत्र कुणाचें, कळ कोणा, तें
तुला जाणवे, मला जाणवे.

फुलांसारखे पथ्थर जमवुनि
उभविलीस ही रास कशाला ?
सुधेसारखें जहर मिळवुनी
भरिले हे मधुकोष कशाला ?

हळवा हळवा श्वास होउनी
कां माझ्या संचरसी देहीं ?
तिमिरावृत करितां मम प्राणां
तुला स्पर्शिते दया न कांहीं ?

ठावें तुज मी अशी भिंगरी,
माझ्या चरणां भ्रमणाची कळ;
तयांस असलें रेशिम लावुन
खचवावें कां—कां माझें बळ ?

मराठी ग्रंथ संग्रहालय
शाखा (स्थळ प्रत)
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# भक्ति

अवघें राउळ, अवघ्या मूर्ती,
भावच अवघा झाला भक्ती ;
अवघ्या निःश्वसितांचीं सुमनें,
·अन् ओठावर गीतआरती !